Date : 24-Mar-2010 Edition : Mumbai Page No.: 2 Page Name: n.a. Size: 82.81 sq. cm

Sector: FMCG Circulation: 90682 AVE: INR 0.00 Frequency: Random

Publication: Sakal - Maharashtra Today Title: Ranbir Kapoor in new look

# Sakal - Maharashtra Today

## रणबीर कपूर आता नवीन 'लुक'मध्ये

मुंबई : उन्हाळ्याच्या दिवसांत शीतपेयांच्या जाहिरातींना अमाप पीक येते. टीव्हीवर जाहिरातींचा मारा, तर रस्त्यावर मोठमोठी होर्डिंग्ज लावली जातात. आता या सर्व जाहिराती शीतपेयांच्या असल्या तरी 'कूल कूल' म्हणणारे हिरो-हिरॉईन्स मात्र 'हॉट अपील'चे घ्यावे लागतात. सध्या रणबीर कपूर हा असा अभिनेता मानला जातो. त्यामुळे आपली शीतपेये विकण्यासाठी अनेक कंपनीवाले त्याच्या मागे लागले होते. परंतु, 'पेप्सी'वाल्यांनी मात्र रणबीरला काबीज केले. आता यापुढे त्यांचे 'कॅंपेनिंग' करताना तो दिसणार आहे. आता जाहिरात म्हटलं की जरा हटके काही तरी असणारच, हे नव्याने सांगण्याची गरज नाही. त्यासाठी कंपनीवाले वाट्टेल तेवढा पैसा मोजतात. त्यामुळे रणबीर आता ही जाहिरात करणार म्हटल्यानंतर साहजिकच त्याचा 'लुक' 'कैसों' कसा बनवायचा यावर दीर्घ काळ चर्चा झाली आणि एकदाचा त्याचा नवीन 'लुक' ठरलादेखील. आता या नवीन लुकप्रमाणे त्याचे केस वेगळ्या पद्धतीने सेट करण्यात आले आहेत. त्याच्या डाव्या हातावर भला मोठा 'टॅटू' रंगविण्यात आला आहे. त्याचे कपडेदेखील चित्रविचित्र पद्धतीचे असणार आहेत. २७ मार्चपासून रणबीरचा हा 'लुक' टीव्हीवर पाहायला मिळणार आहे.





© Sakal - Maharashtra Today